आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः25.06.2024 **वारःमंगळवार**

---

1. सर्वसामान्य जनतेच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सरकार प्रयत्नशील राहील-पंतप्रधानांची ग्वाही,
2. अठराव्या लोकसभेच्या नव्या सभापतींची उद्या निवड,
3. राष्ट्रीय अतिसार निर्मूलन मोहिमेला आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांच्या हस्ते प्रारंभ,
4. पुण्यामध्ये अंमली पदार्थ प्रकरणी बेकायदेशीर पबवर कठोर कारवाई महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्पष्ट निर्देश, आणि
5. टी 20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत ऑस्ट्रेलियाला हरवत भारताची उपांत्य फेरीत धडक

संसद

18 वी लोकसभा विकसित भारताच्या उभारणीसाठी काम करेल, असं सांगून सरकार सर्वांना सोबत घेऊन लोकांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करेल, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिली. संसदेचं अधिवेशन सुरू होण्यापूर्वी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. सरकार चालवण्यासाठी बहुमताची गरज असते, मात्र देश चालवण्यासाठी सर्वांचं एकमत होणं महत्त्वाचं आहे, असं पंतप्रधान म्हणाले.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, प्रारंभी काल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी हंगामी सभापती भर्तृहारी महताब यांना सभापतीपदाची शपथ दिली. त्यानंतर लोकसभेच्या कामकाजाच्या सुरुवातीला महताब यांनी नवनिर्वाचित खासदारांना खासदारपदाची शपथ दिली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यानंतर केंद्रिय मंत्रीमंडळातील सर्व मंत्र्यांनी आणि त्यानंतर अन्य खासदारांनी शपथ घेतली. पुण्याचे खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, जळगावच्या खासदार रक्षा खडसे यांनी मराठीतून शपथ घेतली. संसदेच्या नव्या इमारतीतील सभागृहात पहिल्यांदाच संसद अधिवेशन होत आहे.

विरोधी पक्षांच्या इंडी आघाडीचे खासदार अधिवेशनाच्या कालच्या पहिल्याच दिवशी संसदेत राज्यघटनेच्या प्रती घेऊन आले होते.

उद्या, 26 जूनला नवीन लोकसभा सभापतींची निवड होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन येत्या गुरुवारी 27 जूनला सुरु होणार असून त्याच दिवशी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण होईल. अधिवेशन 3 जुलैपर्यंत चालेल.

पक्षाध्यक्ष

भारतीय जनता पार्टीचे विद्यमान अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची काल राज्यसभेचे सभागृह नेते म्हणून निवड करण्यात आली तर कॉंग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांची राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून निवड करण्यात आली. त्यामुळे देशातील दोन महत्त्वाच्या पक्षांच्या अध्यक्षांना आता संसदेच्या वरिष्ठ सभागृहात आगामी काही दिवस एकमेकांसमोर आपली मुत्सद्देगिरी वापरावी लागणार आहे. अलीकडच्या काळात प्रथमच असा योगायोग सदनामध्ये घडून आला आहे. नड्डा यांचा पक्षाध्यक्षपदाचा

कालावधी लवकरच संपणार आहे. त्यानंतर ते विद्यमान आरोग्यमंत्री आणि राज्यसभेतील पक्षाचे नेते म्हणून सदनात कार्यरत असतील.

गहूसाठा

गव्हाची साठेबाजी रोखण्यासाठी तसंच किमतीवर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारनं गव्हाच्या साठवणुकीवर मर्यादा घातल्या आहेत. सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातले घाऊक, किरकोळ व्यापारी, साखळी पुरवठादार आणि प्रक्रिया उद्योग यांना ही साठवणूक मर्यादा लागू असेल. अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाचे सचिव संजीव चोप्रा यांनी काल नवी दिल्लीत वार्ताहरांना ही माहिती दिली. गव्हाच्या साठ्याची कमाल मर्यादा घाऊक व्यापाऱ्यांसाठी 3 हजार टन, किरकोळ विक्रेत्यांसाठी 10 टन तर साखळी पुरवठादारांसाठी सर्व गोदामांमध्ये मिळून 3 हजार टन इतकी असेल. देशात गव्हाची उपलब्धता कमी असल्याचा वृत्ताचा चोप्रा यांनी इन्कार केला.

अतिसार निर्मूलन

केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांच्या हस्ते काल राष्ट्रीय अतिसार निर्मूलन मोहिमेची सुरुवात करण्यात आली. अतिसारामुळे होणारे बालमृत्यू थांबवणं हा या मोहिमेचा हेतू आहे. दोन महिने चालणाऱ्या या मोहिमेत पाच वर्षांखालच्या बालकांना ओआरएस आणि झिंकची पाकिटं देण्यात येणार आहेत. जलजीवन मिशन, स्वच्छ भारत अभियान आणि आयुष्मान आरोग्य मंदिर नेटवर्क यासारख्या उपक्रमांमुळे अतिसारामुळे होणाऱ्या बालमृत्यूचं प्रमाण कमी झाल्याचं जे. पी. नड्डा यांनी यावेळी सांगितलं. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री अनुप्रिया पटेल आणि प्रतापराव जाधव उपस्थित होते.

नामबदल

केरळ राज्याचं नाव केरळम् असं करण्याचा प्रस्ताव केरळच्या विधानसभेत काल एकमताने संमत झाला. मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी मांडलेला हा प्रस्ताव आता केंद्रसरकारकडे पाठवण्यात येईल. यापूर्वी गेल्या ऑगस्टमध्ये असा प्रस्ताव केरळ विधानसभेने संमत केला होता, मात्र काही त्रुटी राहिल्यामुळे तो बारगळला होता. त्यामुळं हा नवीन प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.

पुणे ड्रग्ज

महाराष्ट्रात पुण्यामध्ये अंमली पदार्थ प्रकरणी बेकायदेशीर पबवर कठोर कारवाई करण्याचे आणि अमली पदार्थांशी संबंधित अवैध बांधकामांवर बुलडोझर फिरवण्याचे स्पष्ट निर्देश राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. पुण्याचे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांना दूरध्वनी करुन मुख्यमंत्र्यांनी हे आदेश दिले. दरम्यान, या प्रकरणी उत्पादन शुल्क विभागाने धडक कारवाई केली आहे. याप्रकरणी आतापर्यंत 9 जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून 8 जणांना अटक करण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त संदीप गिल यांनी दिली आहे. व्हिडिओमध्ये दिसणाऱ्या मुलांचा पुणे पोलीस शोध घेत आहेत; या मुलांनी जेवण आणि मद्यावर 80 ते 85 हजार रुपये खर्च केले; असं गिल यांनी सांगितलं. या प्रकरणी 40 ते 50 जणांची चौकशी केली जाईल. सूचना देऊनही लक्ष ठेवण्यात दिरंगाई केल्याबद्दल दोन पोलिस अधिकारी आणि दोन अंमलदारांवर कारवाई करण्यात आल्याची माहितीही संदीप गिल यांनी दिली.

केजरीवाल

उत्पादन शुल्क प्रकरणात दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या जामिनाविरोधातल्या सक्तवसुली संचालनालयाच्या याचिकेवर दिल्ली उच्च न्यायालय आज सुनावणी होणार आहे. 21 जूनला झालेल्या सुनावणीत न्यायालयाने आपला आदेश राखून ठेवला होता. आज दुपारी न्यायमुर्ती सुधीर जैन यावर निकाल देतील. न्यायालयानं 20 जूनला केजरीवाल यांना जामिन दिल्यानंतर ईडीनं उच्च न्यायालयात धाव घेतली होती. त्यावर उच्च न्यायालयानं जामिन आदेशाला स्थगिती दिली होती.

मिझोराम रेमल

रेमल चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानाची पाहाणी करण्यासाठी केंद्रीय पथकाच्या भेटीनंतर राज्याने केंद्राकडे 237 कोटी रुपयांची मदत मागितली आहे. बाधित लोकांच्या पुनर्वसनासाठी तसेच वादळाने झालेल्या भूस्खलन तसेच मालमत्तेच्या नुकसानाच्या भरपाईसाठी राज्याने मागणी केली आहे. मे महिन्याच्या अखेरीस मिझोरामला रेमल चक्रीवादळाचा तडाखा बसला होता. गृह मंत्रालयाचे सहसचिव अभिजीत सिन्हा यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय पथक जीवितहानी आणि मालमत्ता, पिकांच्या नुकसानीचे मूल्याकनासाठी राज्याच्या दौऱ्यावर आहे.

मणिपूर फेक

खोटे, पुरेशी शहानिशा न केलेले, तथ्यहीन आणि लोकांमध्ये घबराट निर्माण करणारे संदेश पसरवणाऱ्यांविरोधात, कठोर कारवाईचा इशारा मणिपूर सरकारनं दिला आहे. मणिपूरच्या गृहविभागाचे अधिकारी रेहानुद्दीन चौधरी यांनी सोमवारी एका निवेदनाद्वारे, समाजमाध्यमे तसंच इतर माध्यमातून प्रसारित होणारे खोटे संदेश पाठवणाऱ्यांवर कठोर करण्यात येईल असं जाहीर केलं आहे. गेल्या काही दिवसांपासून, केंद्रीय सुरक्षा दलाची अतिरिक्त तुकडी मणिपूरला पाठवण्यात येत असल्याच्या अफवेचे संदेश प्रसारित केले जात आहेत, हे संदेश निरर्थक असून लोकसभा निवडणुकीसाठी राज्याबाहेर गेलेले सुरक्षा कर्मचारी त्यांच्या मूळ तळावर परत असल्याचं चौधरी यांनी निवेदनात म्हटलं आहे.

फराक्का

1996 मधील भारत-बांग्लादेश फराक्का करारानुसार गंगेच्या पाण्याच्या वाट्याबाबत आपल्याशी सल्लामसलत केली नसल्याचा पश्चिम बंगाल सरकारनं केलेला आरोप केंद्र सरकारनं काल फेटाळला. हा करार 2026 मध्ये संपणार आहे. केंद्र सरकारनं बांगलादेशसोबत विशेषत: तिस्ता नदी पाणीवाटप आणि भारत-बांगलादेश फराक्का करार याबाबत पश्चिम बंगाल सरकारला विश्वासात न घेता महत्त्वाचे द्विपक्षीय निर्णय घेऊ नयेत, अशी विनंती पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केल्यानंतर काही तासांतच केंद्र सरकारनं हा आरोप फेटाळला.

झिम्बाब्वे दौरा क्रिकेट संघ

भारतीय क्रिकेट संघाच्या आगामी झिम्बाब्वे दौऱ्यासाठी भारतीय संघ काल जाहीर करण्यात आला. पाच सामन्यांच्या टी 20 मालिकेसाठी शुभमन गिल भारतीय संघाचा कर्णधार असेल. येत्या 6 ते 14 जुलैदरम्यान हे सामने खेळले जाणार आहेत. अभिषेक, नितीश रेड्डी, रियान आणि तुषार यांना संघात पहिल्यांदाच आंतरराष्ट्रीय सामन्यात खेळण्याची संधी मिळणार आहे. यष्टीरक्षक म्हणून ध्रुव जुरेल याची निवड करण्यात आली आहे.

टी 20

गयाना इथं काल भारत- ऑस्ट्रेलिया संघादरम्यान झालेल्या टी 20 विश्वकप स्पर्धेच्या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माच्या धडाकेबाज 92 धावांच्या कामगिरीच्या जोरावर भारताने ऑस्ट्रेलियावर दणदणीत विजय मिळवला. विराट कोहली शून्यावर बाद झाल्यानंतर फलंदाजीला आलेल्या शर्माने 41 चेंडूत 92 धावा केल्या. त्याने धावांचे अर्धशतक केवळ 19 धावांत पूर्ण केले होते. भारताने वीस षटकांत केलेल्या 205 धावांचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ 7 गडी बाद 181 धावा करु शकला.भारतीय गोलंदाजांनी सामन्यात चमकदार कामगिरी केली. अर्शदीप सिंगने 37 धावांमध्ये तीन गडी तर कुलदीप यादव ने 24 धावांच्या मोबदल्यात दोन गडी बाद केले. सुपर 8 गटात एकही सामना न गमावलेल्या भारताने स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.